# डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि.,
## मुख्य कार्यालय : इर्विन चौक, अमरावती

# वार्षिक साधारण सभेची सूचना
सन २०१९ – २०२०

बँकेच्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-19 साथीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या दि.25.02.2021 संदर्भ क्र. संकीर्ण - 2020/प्र.क्र.24/13-स च्या परिपत्रकातील निर्देशानुसार बँकेची 47 वी वार्षिक साधारण सभा मंगळवार, दिनांक 30.03.2021 रोजी, सकाळी 10:30 वाजता व्हिडीओ कॉन्फरन्स (Video Conferencing) / अदर ऑडीओ व्हिजुअल मीन्स (Other Audio Visual Means) व्दारे आयोजित केली आहे. आभासी पध्दतीचा अवलंब केला असल्याकारणाने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे सदर सभा शिवाजीनगर शाखेचे सभागृह, पंचवटी चौक, मोर्शी रोड, अमरावती-444603 येथे आभासी पध्दतीने घेण्यात येत असल्याकारणाने सदर सभेस आपण ऑन लाईन उपस्थित राहावे हि विनंती.

सभेच्या उपस्थितीकरीता सदर्हू लिंक आमसभेपुर्वी पाठविण्यात येईल.

सभेपुढील विषय -

1. 47 व्या वार्षिक साधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीबाबतची नोंद घेवून ती क्षमापित करणे.
2. मागील दिनांक 25.08.2019 रोजीच्या वार्षिक साधारण सभेची कार्यवाही वाचून कायम करणे.
3. सन 2019-20 चा वार्षिक अहवाल, बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेला 2019-20 चा लेखापरिक्षित ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करणे.
4. बँकेचे सन 2019-20 चे अंदाजपत्रकातील ओलांडलेली तरतूद मंजूर करणे.
5. बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेले सन 2020-21 चे अंदाज पत्रक मंजूर करणे.
6. बँकेचा सन 2019-20 चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील बँकेने तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल मंजूर करण्याबाबत विचार करणे.
7. सन 2021-22 करीता बँकेसाठी समवर्ती व अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणेबाबत संचालक मंडळाची शिफारस विचारात घेणे.
8. सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी सनदी लेखापालाची नेमणूक करणे व त्यांचे पारिश्रमिक ठरविण्याबाबत विचार करणे.
9. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्जाची नोंद घेणे.
10. एकरकमी परतफेड प्रकरणांना संचालक मंडळाने केलेली शिफारस मंजूर करणे.
11. बुडीत व संशयीत कर्ज निर्लेखित (Write Off) करणेबाबत संचालक मंडळाने केलेली शिफारस मंजूर करणे.
12. मा. संचालक मंडळाने बँकेचे पोट नियमामध्ये व्यवस्थापकीय मंडळ (Board of Management) स्थापित करण्याबाबत आर.बी.आय. ने सुचविलेल्या मार्गदर्शक सूचनांचा उपविधीत अंतर्भाव करणेबाबत मंजुरात देणे.
13. मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

अमरावती

दिनांक: १६.मार्च.२०२१

संचालक मंडळाचे आदेशावरुन
म.जफर कुरेशी
कार्यकारी संचालक

## सूचना

1. सभेच्या नियोजित वेळेपर्यंत म्हणजेच सकाळी 10:30 वाजेपर्यंत गणपुर्ती न झाल्यास सभा स्थगित करण्यात येईल व स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी आभासी पध्दतीव्दारे अर्ध्यातासानंतर म्हणजेच सकाळी 11:00 वाजता घेण्यात येईल. अशा सभेस गणपुर्तीची गरज राहणार नाही.
2. जेव्हढे सन्माननीय सभासद, बँकेने ह्या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती गण संख्या मोजतांना त्यावेळी ग्राह्य धरल्या जाईल.
3. इंटरनेट सेवा उपलब्ध असलेला संगणक /LAP TOP/स्मार्ट फोन या व्दारे सन्माननीय सभासद साधारण सभेस उपस्थित राहू शकतील. इंटरनेट सेवेबाबत काही अडचणी असतील तर त्या सोडविणे बँकेच्या अखत्यारीत नाही.
4. 47 व्या वार्षिक साधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सन्माननीय सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आय.डी./एस.एम.एस. वर सूचनापत्रासह आय.डी. आणि पासवर्ड पाठविण्यात येतील. जे सन्माननीय सभासद ई-मेल आय.डी. व मोबाईल क्र. दि.23.03.2021 पर्यंत बँकेत नोंदणी करतील त्यांना लॉगिन आय.डी. व पासवर्ड संबंधित ई-मेल आय.डी./एस.एम.एस. वर पाठविण्यात येईल.
5. सभासदांना काही सूचना, ठराव इत्यादी सभेपुढे मांडावयाचे असल्यास अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास ते कृपया बँकेचे ई-मेल आय.डी. pducbagm@gmail.com अथवा whatsup / Telegram नं. 9420337962, 9403327962 किंवा लेखी स्वरुपात दिनांक 23.मार्च.2021 रोजी सायंकाळी 6:00 वाजेपर्यंत मुख्य कार्यालयात पोहचतील याची काळजी घ्यावी. त्यानंतर आलेल्या किंवा वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची दखल घेणे शक्य होणार नाही.
6. सभेस सुरुवात झाल्यानंतर सर्व प्रथम सभेच्या विषय पत्रिकेनुसार सर्व विषय सभेपुढे मंजुरीसाठी मांडण्यात येतील. त्यानंतर सभासद आभासी (Online) पध्दतीने विचारलेले प्रश्न अथवा सूचना बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर नोंदविलेले अथवा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासन विभागाकडे लेखी स्वरुपात प्राप्त झालेले प्रश्न, त्यांची उत्तरे त्याच लिंकवर देण्यात /जाहीर करण्यात येईल.
7. सभेच्या विषय पत्रिकेनुसार वार्षिक साधारण सभेत सादर करण्यात आलेल्या ठरावावर सभासदांनी त्याच लिंकवर आपले मत नोंदणी करणे आवश्यक आहे. ठराव मंजूर अथवा नामंजूर झाल्याचा निर्णय मत मोजणी पूर्ण झाल्यानंतर त्याच लिंकवर / संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.
8. सभासदांनी पत्ता बदलला असल्यास अद्यावत पत्त्याबाबत माहीती बँकेस द्यावी.
9. सभासदांनी वारस नेमले नसल्यास ते नेमण्याचे करावे.
10. अहवालाच्या प्रती बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.
11. भागधारक सभासदांनी आपले खाते क्रमांक मुख्यालयास कळवावे.
12. खाते धारकांनी संबंधित शाखेस आपला दुरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक द्यावा.
13. टी.डी.एस. कपात करणे आवश्यक असल्यामुळे पॅन (PAN) क्रमांक व ई-मेल (असल्यास) संबंधित शाखेवर द्यावा.
14. बँकेचा वार्षिक अहवाल सर्व सभासदांना पोस्टाव्दारे पाठविला आहे. तसेच वार्षिक अहवालाची प्रत दिनांक 16.03.2021 पासून सर्व शाखांमध्ये आणि प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत उपलब्ध राहील. तसेच बँकेच्या www.pducbank.com या संकेतस्थळावर (वेब साईट वर) उपलब्ध असेल.